महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्रशासनअंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेलाबॅटरीजविस्तारीतइमारत,तळमजला,प्लॉटनं.१,धारावीरोड,माटुंगा,मुंबई४०००१९
email : managerbcrrc1@gmail.com website : www.mahadiscom.in
दुरध्वनीक्रमांक:०२२-२४०१३५०५ फॅक्सक्रमांक:०२२-२४०२५७६३

क्र.मासंप्र/मावक/सु.प.३७/ 17057 दिनांक: 16/10/2020

प्रति,
मुख्यअभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
अमरावती/अकोला/औरंगाबाद/भांडुप/बारामती/जळगांव/
चंद्रपूर/गोंदिया/कल्याण/कोल्हापूर/लातूर/नागपूर/नांदेड/
नाशिक/पुणे/रत्नागिरी.

**विषय :** सुधारपत्र क्र. २८ दि. १६/०४/१९७५ अंतर्गत अनुकंपा तत्त्वावरील नोकरीच्या प्रस्तावांबाबत.

---------------

१. उपरोक्त विषयास अनुसरुन, म.रा.वि.वि.कंपनीचे वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ मधील परिशिष्ट-'ज' अन्वये (सुधारपत्र क्र. २८ दि. १६/०४/१९७५ व सुधारपत्र क्र. ३७ दि. ०३/११/२०१०) मुत/वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवाविनवृत्त कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांकडून अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळणेसाठी अर्जासह शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, विविध प्रतिज्ञापत्रे इ. कागदपत्रे विभागीय/मंडळ/ परिमंडळ स्तरावर सादर केली जातात.

२. त्या अनुषंगाने सर्व परिमंडळ कार्यालयाच्या कामकाजामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी, अवलंबितांच्या प्रस्तावाची पडताळणी सुलभ करण्याच्या दृष्टीने तसेच अवलंबितास कागदपत्रे सादर करण्यासाठी होणारा आर्थिक खर्च कमी करण्याच्या दृष्टीने सुधारपत्र क्र. ३७ दि. ०३/११/२०१० अनुसार प्रस्तावासोबत सादर करावयाची वेगवेगळी प्रतिज्ञापत्रे (पालनपोषण, सरकारी-निमसरकारी सेवेत नोकरी, महाराष्ट्रामध्ये कोणत्याही ठिकाणी नोकरी करणेबाबत इ. प्रतिज्ञापत्रे) एकत्रितपणे म्हणजेच एकाच प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार अवलंबिताकडून घेण्यात यावीत. त्याचप्रमाणे इतर अवलंबितांची संमतीपत्रे ही सुध्दा एकत्रितपणे वेगळया प्रतिज्ञापत्रामध्ये घेण्यात यावीत.

३. तसेच सदरची तरतूद ही अवलंबितास प्रस्ताव सादर करणे सोयीचे व्हावे याकरीता करण्यात आली असून सद्यस्थितीमध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये वेगवेगळी प्रतिज्ञापत्रे सादर केली असल्यास ती ग्राह्य धरण्यात यावीत.

४. तसेच सध्या सर्वत्र टाळेबंदी (Lockdown) चालू असल्यामुळे सांघिक कार्यालयाचे बहुतांश कामकाज हे Online सुरु आहे. सबब, आपणास विनंती करण्यात येते की, सांघिक कार्यालयास सादर करावयाच्या अवलंबितांच्या प्रस्तावांची आपल्या स्तरावर काटेकोरपणे छाननी करावी व सोबत दिलेल्या कागदपत्रांच्या यादीमधील (चेकलिस्ट) मुद्यानुक्रमाने योग्य ती कागदपत्रे जोडावीत. तसेच पात्र अवलंबितांचे परिपूर्ण प्रस्ताव (राज्यस्तरीय सेवाज्येष्टताची प्रकरणे तसेच इतर सांघिक कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यात येणारे प्रस्ताव) एका प्रतीत (Hard Copy) पाठविण्याबाबत आणि सदर प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह Scan करुन त्याची सॉफ्ट कॉपी managerbcrrc1@gmail.com या ई-मेलवर पाठविण्याबाबत संबंधितास सूचना देण्यात याव्यात.

सोबत : चेकलिस्ट.

(कमांडर शिवाजी इंदलकर,निवृत्त)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :-**
१) संचालक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रा, मुंबई.
२) गृह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.

**प्रत रवाना :-**
महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रा, मुंबई.



Scanned with CamScanner

## कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी

अनु. क्र.

**कागदपत्रांची यादी (Check List)**

१. अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी अर्जदाराचा **मूळ अर्ज**.

२. मृत कर्मचाऱ्याचा **मृत्युचा दाखला**/वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्ती आदेश.

३. कार्यालयाने सादर करावयाचे लेखापरीक्षित **इतिवृत्त**.

४. मयत कर्मचाऱ्याच्या वारसदारांची माहितीचे **प्रपत्र A-१**

५. (क) अर्जदाराचा **जातीचा दाखला**
   (ख) जातवैधता प्रमाणपत्र
   (ग) जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास प्र.प.क्र. ३७८ दि. ०४.०१.२०१२ अन्वये नियुक्तीच्यावेळी जातवैधता प्रमाणपत्राकरिता आवश्यक सर्व कागदपत्रे कार्यालयाकडे सादर करुन असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

६. **उन्नत गटात मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र** (Non Creamy Layer Certificate)

७. अर्जदाराची **शैक्षणिक अर्हता** सिध्द करणारे गुणपत्रिका उत्तीर्ण प्रमाणपत्र (All semesters) व शाळा सोडल्याचा दाखला.

८. अ) जिल्हा न्यायालय/दिवाणी सत्र न्यायालयाने निर्गमित केलेले **कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र**.
   ब) जिल्हा न्यायालय/दिवाणी सत्र न्यायालयाने निर्गमित केलेले कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र नसल्यास अर्जदाराने कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र **३ महिन्याच्या आत** सादर करणेबाबत प्रतिज्ञापत्र.

९. इतर अवलंबितांचे संमती/**ना-हरकत प्रतिज्ञापत्र**.

१०. अर्जदाराने उर्वरीत सर्व अवलंबितांचे **पालनपोषण** करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

११. अर्जदाराने कंपनीच्या सेवेत **महाराष्ट्रामध्ये कोठेही काम करण्यास** संमती देण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

१२. कुटुंबातील इतर व्यक्ती **शासकीय, निमशासकीय व इतर ठिकाणी नोकरी करीत** नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

१३. अर्जदाराने मृत **कर्मचाऱ्यांच्या वारसदाराविषयी** प्रतिज्ञापत्र.

१४. जर अवलंबित मागासवर्ग जातीचे फायदे/ सवलती घेणार नसेल तर **मागासवर्गीय जातीचे फायदे/ सवलती न घेण्याबाबतचे** प्रतिज्ञापत्र.

१५. मृत कर्मचाऱ्याच्या कोणत्या अवलंबितास **मासिक निर्वाह भत्ता** कधी मंजूर करण्यात आला आहे. मंजुरी आदेश व त्याबाबतचा तपशील.

१६. इतर आवश्यक कागदपत्रे जसे की नावात बदल केलेबाबतचे गॅझेट, पंचनामा अहवाल, इतर अवलंबितांपैकी कोणी अर्ज केला असल्यास त्यांचा मूळ अर्ज व प्रस्ताव इत्यादी.

Scanned with CamScanner